ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# परभणी जिल्ह्यातील रस्ते सुविधा आणि सेवाकेंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा भौगोलिक अभ्यास

गोने पद्माकर बालाजी[१] , प्रा.डॉ.नामदेव वाघमारे[२]
[१]संशोधक विद्यार्थी , स्कूल ऑफ अर्थ सायन्स , स्वा.रा.ती.म.वि. नांदेड.
[२]संशोधन मार्गदर्शक व भूगोल विभागप्रमुख , इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड.

## १.१ प्रस्तावना




सेवा केंद्राच्या वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकामध्ये वाहतूक सुविधांची उपलब्धता हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. ही सुलभता त्या प्रदेशात असलेल्या रस्ते आणि रेल्वेमार्ग विकासावर अवलंबुन असते. रस्ते व रेल्वे वाहतुक विकास आणि आर्थिक विकास एकमेकांवर अवलंबून आहेत. त्या प्रदेशातील आर्थिक विकासात वाढ झाली असता तेथील लोकांची क्रयशक्ती सुद्धा वाढते आणि त्या प्रदेशात विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांची मागणी ही वाढते.

सेवा केंद्राचे वितरण आणि त्या प्रदेशातील वाहतुक सुलभता यांचा परस्परसंबंध आहे. ज्या तहसीलमध्ये रस्त्यांची घनता अधिक आहे. त्या तहसीलमध्ये सेवा केंद्राची घनता अधिक असल्याचे दिसून येते. अभ्यासक्षेत्रातील पक्के रस्ते असलेल्या वाहतूक मार्गावर सेवा केंद्राचे अधिक केंद्रीकरण झालेले दिसून येते. वाहतुक मार्गाची घनता आणि सेवा केंद्राची घनता यांचा सहसंबंध अभ्यासला असता ज्या प्रदेशात वाहतुकीचे मार्ग विकसित झालेले आहेत. त्या प्रदेशात सेवा केंद्राची संख्या ही अधिक असल्याचे आढळून येते.

## १.२ अभ्यास क्षेत्र

परभणी जिल्हा हा महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. परभणी जिल्हा १८°४५' उत्तर ते २०°०१' उत्तर अक्षांश आणि ७६°१३' पूर्व ते ७७°३९' पूर्व रेखांश या भौगोलिक पट्टयामध्ये वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली, पश्चिमेस बीड आणि जालना, दक्षिणेस लातूर व पुर्वेस नांदेड व हिंगोली हे जिल्हे आहेत. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ६५११.५८ चौ.कि.मी. आहे. परभणी व हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवरुन पूर्णा नदी वाहते. तर गोदावरी नदी परभणी आणि बीड जिल्ह्याच्या सिमेवरुन वाहते. गोदावरी नदी पाथरी, गंगाखेड व पालम या तहसीलमधून वाहते. (नकाशा क्र.१.१)

सन २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८३६०८६ इतकी आहे. परभणी जिल्ह्यात एकूण ८४३ खेडी असून त्यापैकी ८३० वस्ती असलेली तर १३ ओसाड आहेत. प्रशासकीय दृष्ट्या या जिल्ह्याचे परभणी, जिंतूर, गंगाखेड, पालम, पाथरी, पूर्णा, सेलू, सोनपेठ व मानवत अशा नऊ तालुक्यांमध्ये विभाजन झालेले आहे.




नकाशा क्र. १.१

### १.३ उद्दिष्ट्ये

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता अभ्यास क्षेत्रातील पक्क्या रस्त्याने जोडलेल्या ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास करणे आणि अभ्यास क्षेत्रात उपलब्ध असलेल्या सेवाकेंद्राचा अभ्यास करणे हे दोन प्रमुख उद्दिष्ट्ये समोर ठेवण्यात आली आहेत.

### १.४ आकडेवारी संकलन


प्रस्तुत शोधनिबंधाकरिता आवश्यक असणारी दुय्यम स्वरूपाची आकडेवारी संकलित करण्याकरिता जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, जिल्हा गॅझेटिअर, जनगणना पुस्तिका, विविध संशोधन पत्रिका व इंटरनेटचा आधार घेण्यात आलेला आहे.

### १.५ अभ्यास पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता संकलित करण्यात आलेल्या दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचे विश्लेषण सारणी व नकाशाच्या आधारे तयार करण्यात आले आहेत. त्यासाठी सरासरी मूल्य व प्रमाण विचलन या सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

### १.६ पक्क्या रस्त्यानी जोडलेल्या ग्रामीण वस्त्या

तहसील निहाय पक्का रस्ता असलेल्या वस्त्यांची टक्केवारी सारणी क्र.१.१ मध्ये दाखवलेले आहे. जिल्ह्याचे पक्क्या रस्त्याने जोडलेल्या ग्रामीण वस्त्यांचे प्रमाण हे ९८.०७ टक्के एवढे हे प्रमाण तहसीलनिहाय वेगवेगळे असलेले दिसून येते. पक्क्या रस्त्याने जोडलेल्या वस्त्यांचे प्रमाण दाखविण्यासाठी सरासरी ( $\bar{X}$ ) आणि प्रमाण विचलन $(S.D.)$ काढून त्याआधारे त्याचे चार गटात वर्गीकरण केलेले आहे. त्याद्वारे पक्क्या रस्त्याने जोडलेल्या सर्वात जास्त वस्त्या $(\bar{X}+2S.D.)$ , पक्क्या रस्त्याने जोडलेल्या जास्त वस्त्या $(\bar{X}+1S.D.)$ पक्क्या रस्त्याने जोडलेल्या मध्यम वस्त्या $(\bar{X}-1S.D.)$ आणि पक्क्या रस्त्याने जोडलेल्या कमी वस्त्या $(\bar{X}-2S.D.)$ दाखविण्यात आलेल्या आहेत.




नकाशा क्र. १.२

पक्क्या रस्त्याने जोडलेल्या वस्त्यांची सरासरी मूल्य ( $\bar{X}$ ) हे ९८.१४ एवढे आहे तर प्रमाण विचलन मूल्य $(S.D.)$ हे १.७४ एवढे आहे.अभ्यास क्षेत्रातील सरासरी अधिक दोन प्रमाण विचलन $(\bar{X}+2S.D.)$ म्हणजेच पक्क्या रस्त्याने जोडलेल्या सर्वात जास्त वस्त्या या गटात मानवत व पालम या दोन तालुक्याचा समावेश होतो. पक्क्या रस्त्याने जोडलेल्या जास्त वस्त्या या गटात म्हणजेच सरासरी अधिक एक प्रमाण विचलन $(\bar{X}+1S.D.)$ या गटात जिंतूर, पाथरी, सोनपेठ आणि गंगाखेड या चार तालुक्यांचा समावेश होतो.

**तक्ता क्र.१.१**

**पक्क्या रस्त्याने जोडलेल्या वसाहतींची टक्केवारी आणि एकूण वस्त्यांशी असलेली सेवा केंद्राची टक्केवारी**


| अ.क्र. | तहसिल | ग्रामीण वस्त्या | पक्क्या रस्त्याने जोडलेल्या वसाहतीची टक्केवारी | सेवा केंद्र | सेवा केंद्राची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेलू | ९१ | ९७.८५ | ०९ | ९.६८ |
| ०२ | जिंतूर | १६५ | ९९.४० | १७ | १०.२४ |
| ०३ | परभणी | १२३ | ९६.०९ | २२ | १७.१९ |
| ०४ | मानवत | ५४ | १०० | ०६ | ११.११ |
| ०५ | पाथरी | ५५ | ९८.२१ | ११ | १९.६४ |
| ०६ | सोनपेठ | ५६ | ९८.२५ | ०६ | १०.५३ |
| ०७ | गंगाखेड | १०४ | ९९.०५ | ०८ | ७.५२ |
| ०८ | पालम | ८१ | १०० | ०७ | ८.६४ |
| ०९ | पूर्णा | ८५ | ९४.४४ | १० | ११.११ |
| | **एकूण** | **८१४** | **९८.०७** | **९६** | **११.५७** |
| | | | $\bar{X}$ =९८.१४<br>$S.D.$=१.७४ | | $\bar{X}$ =११.७४<br>$S.D.$=३.७८ |

स्त्रोत : संशोधकाने संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित

तर सरासरी उणे एक प्रमाण विचलन $(\bar{X}-1S.D.)$ या गटात म्हणजेच पक्क्या रस्त्याने जोडलेल्या मध्यम ग्रामीण वस्त्यात सेलू या एकाच तालुक्याचा समावेश होतो आणि पक्क्या रस्त्याने जोडलेल्या कमी ग्रामीण वस्त्या म्हणजे सरासरी उणे दोन प्रमाण विचलन $(\bar{X}-2S.D.)$ या गटात परभणी व पूर्णा या दोन तालुक्यांचा समावेश होतो. (नकाशा क्र.१.२)

## १.७ सेवाकेंद्राची टक्केवारी

अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय एकूण ग्रामीण वस्त्यांपैकी त्या त्या तालुक्यात असलेल्या सेवा केंद्राच्या टक्केवारीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याचे वितरण दाखविण्यासाठी त्याचे सरासरी $(\bar{X})$ आणि प्रमाण विचलन $(S.D.)$ यांचे मूल्य काढून त्याआधारे त्याचे चार गटात वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तहसीलनिहाय असलेल्या सेवाकेंद्राच्या टक्केवारीचे सरासरी मूल्य $(\bar{X})$ हे ११.७४ तर प्रमाण विचलन मूल्य $(S.D.)$ हे ३.७८ एवढे असल्याचे दिसून येते. त्याआधारे सर्वात जास्त सेवा केंद्र असलेला गट सरासरी अधिक दोन प्रमाण विचलन $(\bar{X}+2S.D.)$ जास्त सेवा केंद्र असलेला गट सरासरी अधिक एक प्रमाण विचलन $(\bar{X}+1S.D.)$ मध्यम सेवा केंद्र असलेला गट हा सरासरी उणे एक प्रमाण विचलन $(\bar{X}-1S.D.)$ आणि कमी सेवा केंद्र असलेला गट म्हणजे सरासरी उणे दोन प्रमाण विचलन $(\bar{X}-2S.D.)$ या चार गटाचा समावेश होतो.




नकाशा क्र. १.३

अभ्यास क्षेत्रातील सर्वात जास्त सेवा केंद्र गटात $(\bar{X}+2S.D.)$ परभणी आणि पाथरी या दोन तालुक्यांचा समावेश होतो. जास्त सेवा केंद्र असलेल्या गटात $(\bar{X}+1S.D.)$ अभ्यास क्षेत्रातील एकाही तालुक्याचा समावेश होत नाही. मध्यम सेवा केंद्र असलेल्या गटात $(\bar{X}-1S.D.)$ सेलू, जिंतूर, मानवत, सोनपेठ, पालम आणि पूर्णा या सहा तालुक्यांचा समावेश होतो. तर शेवटच्या कमी सेवा केंद्र असलेल्या गटात $(\bar{X}-1S.D.)$ जिल्ह्यातील गंगाखेड या एकाच तालुक्याचा समावेश होतो. (नकाशा क्र.१.३)

## निष्कर्ष

अभ्यास क्षेत्रातील सरासरी अधिक दोन प्रमाण विचलन $(\bar{X}+2S.D.)$ म्हणजेच पक्क्या रस्त्याने जोडलेल्या सर्वात जास्त वस्त्या या गटात मानवत व पालम या दोन तालुक्याचा समावेश होतो. पक्क्या रस्त्याने जोडलेल्या जास्त वस्त्या या गटात म्हणजेच सरासरी अधिक एक प्रमाण विचलन $(\bar{X}+1S.D.)$ या गटात जिंतूर, पाथरी, सोनपेठ आणि गंगाखेड या चार तालुक्यांचा समावेश होतो. तर सरासरी उणे एक प्रमाण विचलन $(\bar{X}-1S.D.)$ या गटात म्हणजेच पक्क्या रस्त्याने जोडलेल्या मध्यम ग्रामीण वस्त्यात सेलू या एकाच तालुक्याचा समावेश होतो आणि पक्क्या रस्त्याने जोडलेल्या कमी ग्रामीण वस्त्या म्हणजे सरासरी उणे दोन प्रमाण विचलन $(\bar{X}-2S.D.)$ या गटात परभणी व पूर्णा या दोन तालुक्यांचा समावेश होतो.

अभ्यास क्षेत्रातील सर्वात जास्त सेवा केंद्र गटात $(\bar{X}+2S.D.)$ परभणी आणि पाथरी या दोन तालुक्यांचा समावेश होतो. जास्त सेवा केंद्र असलेल्या गटात $(\bar{X}+1S.D.)$ अभ्यास क्षेत्रातील एकाही तालुक्याचा समावेश होत नाही. मध्यम सेवा केंद्र असलेल्या गटात

$(\bar{X}-1S.D.)$ सेलू, जिंतूर, मानवत, सोनपेठ, पालम आणि पूर्णा या सहा तालुक्यांचा समावेश होतो. तर शेवटच्या कमी सेवा केंद्र असलेल्या गटात $(\bar{X}-1S.D.)$ जिल्ह्यातील गंगाखेड या एकाच तालुक्याचा समावेश होतो.

## संदर्भ


1) Dhanushawar, R.S. (2009) "A study of Spatial Organization of Market Centers in Latur District, Unpublished Ph.D. Thesis S.R.T.M.U. Nanded.
2) Dixit, R.S.,(1988): Spatial Organisation of Market Centres, Pointer Publication, Jaipur, pp.94-134.
3) Gone, S.H. (2008) : 'A study of geographical analysis of market centres in Parbhani district', Unpublished Ph.D. Thesis, S.R.T.M.U. Nanded
4) Gone, S.H. (2012) : 'Spatial Distribution of Service Centres in Parbhani District', Golden Research Thoughts, Vol.-II, Issue-II, Pp.50-52.
5) Gone, S.H. (2008) : 'A study of geographical analysis of market centres in Parbhani district', Unpublished Ph.D. Thesis, S.R.T.M.U. Nanded
6) Gone, S.H. (2012) : 'Spatial Distribution of Service Centres in Parbhani District', Golden Research Thoughts, Vol.-II, Issue-II, Pp.50-52.
7) Gone S.H. (2012) Distributional Pattern of Market Centres in Parbhani District, Indian Streams Research Journal Vol.2, Issue VII Aug.2012 ISSN 2230-7850 P. 61-63
8) Gone, S.H. (2015), 'Spatial Organization of Market Centres in Parbhani District', Unpublished Minor Research Project, University Grants Commission (WRO), Pune.
9) Jadhav, B.S. (2013) 'Organization of service centres in Rural Hilly Area of Kolhapur District (M.S.)' Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ) Pp.53 to 60.
10) Lokhande, T.N. & Pawar, C.T.,(1999): Periodicity and Distributional Pattern of Market Centres in Kolhapur District of Maharashtra Journal of the Shivaji University (Science), Vol.36, pp.65-72.
11) Misra, B.N. and Misra, Pankaj (2004): "Spatial Pattern of Service Centres and Planning-A Case Study of Jaunpur District, U.P.", The Deccan Geographer, Vol.42, No.1, Pp.29-38.
12) Tiwari, R.C. (1980): "Spatial Organization of Service Centres in Lower Ganga-Yamuna Doab", *National Geographers,* 15 (2), Pp.103-124.